सकाळ
रविवार, २४ जानेवारी २०२१

## कथालेखन स्पर्धेत हर्षदा हिंगणे प्रथम



हर्षदा हिंगणे

**सातारा :** शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघातर्फे आयोजित कथालेखन स्पर्धेत येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभागाची (एमए) विद्यार्थिनी हर्षदा हिंगणे हिने लिहिलेल्या 'नवी पालवी' या कथेस प्रथम क्रमांक मिळाला. हर्षदास डॉ. सुभाष वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. तिचे रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार सोनाळकर, डॉ. प्रकाश दुकळे, स्पर्धा संयोजक डॉ. भरत जाधव, प्राचार्य डॉ. दिलीप गायकवाड, डॉ. अनिल वावरे, प्रा. तानाजी देवकुळे, डॉ. सुरेश झोडगे, मराठी विभागप्रमुख डॉ. सुभाष वाघमारे, डॉ. मानसी लाटकर, डॉ. कांचन नलावडे, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. संजयकुमार सरगडे यांनी तिचे अभिनंदन केले. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय (तासगाव, जि. सांगली) येथे फेब्रुवारीत होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या अधिवेशनात तिला पारितोषिक देऊन गौरविले जाणार आहे.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.